दिनांक १०/०८/२०२३

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०९/०८/२०२३ चे ००.०१ ते २४.०० वा.

## विनयभंग

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | झोन क्र. | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपुरी गेट अप नं ३८२ कलम ३५४,३५४ (ड),३२३,५० ४,५०६ भादवी सहकलम ८,१२ पो क्सो | 1 | अमरावती | दि.८.८.२३ चे २०.०० वा<br><br>दि.९.८.२३ वेळ ००.३८ | एक महीला | अवेजखान जब्बार खान रा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि,फिर्यादी व आरोपी यांचे मागील ५ महिन्याअगोदर अफेअर होते परंतु २ महिन्याअगोदर पासुन आरोपी यांच्या सोबत बोलन बंद होते नमुद घ ता वेळी व ठिकाणी आरोपी हा आठ दिवसापासुन फिर्यादी कॉलेज ला जातांना तिचा पाठलाग केला व म्हणाला कि, मेरे से शादी करले नही तो तेरे भाई को मारुंगा और तेरे को बोरे मे भरके मारुंगा अशी धमकी दिली वरून सदर घटना फिर्यादीने तिच्या आईला सांगितली वरून फिर्यादीला कॉलेज ला सोडुन देणे व आणणे करिता आई सोबत जात होती दि.८.८.२०२३ रोजी फिर्यादी हि तिच्या मैत्रीणीसोबत मोहल्यातील मदरसा येथे जात असतांना रस्त्यामध्ये बोरींग जवळ आरोपी उभा असतांना त्याने फिर्यादीला शिविगाळ केली व तु मेरी हो जा असे बोलुन बासाने दोन्ही पायावर मारले व दोघी मैत्रीनी खाली बसल्या तर त्याच्या पाठीवर मारले तेव्हा त्या ओरडायला लागल्या .तेव्हा त्याच्या मोहल्यातील रेहान भाई यांनी त्यांना सोडविल्या नंतर त्या दोघी मदरसा मध्ये गेल्या तेव्हा मदरसा मधे फिर्यादीची आई आली तेव्हा आरोपी आवेज याला विचारले तुने क्यु मारा तेव्हा आरोपी याने फिर्यादीच्या आईला शिविगाळ करुन म्हटले कि अभी कम मारा बादमे ज्यादा मारुंगा अशी धमकी दिली व पुन्हा पाठलाग करून आरोपी याने फिर्यादीला म्हटले मेरे से शादी करले तु मेरी हो जा, असे बोलुन विनयभंग केला अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## वाहन चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र. ६१५/२०२३ कलम ३७९भादवि | ऑक्सीजन पार्क आशियाना चौक अमरावती | दि. ०६/०८/२०२३ चे १५.०० वा ते १६.०० वा दरम्यान ०९/०८/२०२३ चे १६.३४ | शेख अफजल वल्द शेख जुल्फु वय ५२ वर्ष, धंदा-खेळणी विक्री, रा. पठाण चौक उस्मानिया हॉटेल मागे, अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे त्यांची हिरो होंन्डा कंपनीची स्प्लेंन्डर मोटरसायकल क्र. MH-२७ CG-४१७५ काळ्या रंगाची सिलव्हर पट्टा असलेली लाल काळ्या रंगाची सिटव्हर व हेड साईचे वर MD लिहिलेले जिचा इंजिन नं. HA१०AGJHA८५४६८, चेचिस नं. MBLHAR०७६JHA७५७४५अशी वर्णनाची कि.अं.२५,०००/-रु.ने त्यांचा मुलगा व मित्र यांच्या सह फिरायला गेले असता सदर गाडी आक्सीजन पार्क येथील पार्कीगमध्ये पार्क करुन पार्क मध्ये गेले व काही वेळाने पार्क मधुन फिरुन आल्यानंतर गाडी ठेवलेल्या ठिकाणी आले असता सदर वरिल गाडी ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही तीचा आजुबाजुला व आज पावेतो शोध घेतला मिळुन आली नाही ती कोतिरि अज्ञात चोराने चोरुन नेली अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र. ६१६/२०२३ कलम ३७९भादवि | ऑक्सीजन पार्क अमरावती | दि. ०९/०८/२०२३ चे १७.० वा ते १७.४५ वा दरम्यान ०९/०८/२०२३ चे २२.०८ | सुरेंद्र महादेवराव डोंगरे वय ४२ वर्ष, धंदा-मजुरी, रा. बागडे ले आउट महादेवखोरी परिसर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी टु व्हीलर गाडी हिरोडोंन्डा फॅशन प्रो गाडी क्र. MH-२७ AP-८५०६ ने मुलगा नामे सुनिल वय ६ वर्ष, याला घेवुन ऑक्सीजन पार्क येथे गेले व पार्कीग मध्ये गाडी लावुन मुलासोबत आक्सीजन पार्कचे आत गेले व काही वेळाने पार्क मधुन पार्कीग मध्ये पार्क केलेल्या ठिकाणी आले असता फिर्यादीला त्यांची ब्लु रंगाची गाडी टु व्हीलर गाडी हिरोडोंन्डा फॅशन प्रो गाडी क्र. MH-२७ AP-८५०६ जिचा चेचिस नं. MBLHA१० EWBHB४८८६७, इंजिन नं. HA१०EDBHB५१८४८ कि.अं.२२,०००/-रुची जुनी वापरती दिसुन आली नाही फिर्यादीने आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही . ती कोणितरि अज्ञात चोराने चोरुन नेली अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.ठाणे गाडगेनगर अप.क्र. १००१/२३ कलम ४५४,३८० भा.द.वि. | अमरावती | दि. ०८.०८.२३ चे १३.०० वा ते २२.००वा<br><br>दाखल दि. ०९.०८.२३ चे ०२.०२ वा. | एक महीला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फि दि. ०८.०८.२३ चे दुपारी १३.००वा कामाला गेले व २२.००वा परत आले असता त्याचे घरातील बेडरुम मधील घरातील कपाटातील लॉकर उघडे दिसले कपाटात सोन्याची ६ ग्रम.पोत किं.१८०००/- रु. व नगदी २०,०००/- रु. असा एकुण ३८,०००/- रु. चा माल कुणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला अशा फि.चे जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १००३/२०२३ कलम ३८०, ४५४ भादवी | संतोषी नगर गल्ली नं ५ अमरावती | दि ९.८.२०२३ चे ०९.०० वा ते ९.८.२०२३ चे १९.०० वा<br><br>दि ०९.०८.२०२३ चे २३.०६ वा | मनोज मोतीलाल गुप्ता वय ६० धंदा व्यापारी रा संतोषी नगर गल्ली नं ५ अमरावती | अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी यातील फींयादी हे बारदाना व्यापारी असुन नमुद ठीकानी राहत असुन व घटना ता वेळी व ठीकानी यातील फींयादी हे आपल्या व्यापारा करीता ०९.०८.२०२३ चे सकाळी ०९.०० वा इतवारा मज्जीद येथे गेले व संध्याकाळी १९.०० वा परत आले असता समोरील कंम्पाउंडचा लोखंडी गेट चा कुलुप उघडले व घरातील मुख्य दरवाज्याचे कुलुप उघडुन आत प्रवेश केला असता तेव्हा फींयादीचे मुलांची फाइल पडलेली दीसली व स्वयंपाक खोलीत गेलो असता खोलीतील आलमारी उघडली दीसली त्या आलमारी मध्ये मी ठेवलेले दागीने पाहीले असता त्यामध्ये १ नं २.५ तोळयाचे मंगळसुत्र २ नग की अं १५०,००० रू २ नं १२ ग्राम सोन्याचा गोप की अं ३६००० रू नं ३ नं ३ ग्राम सोन्याचा तीन अंगठया की अं १८,००० रू ४ नं १ नग १० ग्राम चांदीची चैनपटटी की अं ५००० रू ५ नं नगदी २०,००० रू असा एकुन २,२९००० रू मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला अशा फींयादीचे जबानी रीपोंट वरून सदर चा गुन्हा दाखल |

# अपघात

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नांदगाव पेठ अप.क्र. २९४/२३ कलम २७९, ३२३, ३३७, ५०४ भादवि सहकलम १३४ मो.वाहन कायदा | अमरावती | दि.०९/०८/२३ चे १४/३० वा.<br><br>दि.०९/०८/२३ चे २०/१४ वा.<br><br>दि.०९/०८/२३ चे २०/१४ वा. | निर्मल चव्हाण. रा. अमरावती | मोटर सायकल क्र. एम.एच. २७ सि.ई. ९९५७ | हकिकत अशा प्रकारे आहे कि घटना ता. वेळी व ठिकाणी नमुद मोटर सायकल चालकाने त्यांचे ताब्यातील मोटर सायकल हयगयीने व निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादचे सायकलीस मागुन ठोस मारली त्यामध्ये फिर्यादी जखमी झाले तसेच फिर्यादी सोबत हुज्जत घालुन थापडांनी मारहान केली व शिविगाळ केली अशा फिर्यादी यांचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र. 336/2023 कलम 279, 337 भादवी | ईर्विन चौक ते मालवीय चौक च्या दरम्यान उडान पुलाजवळ अमरावती | दि. 09/08/2023 चे 04.00 वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ 09/08/23 चे 19.30 वा | एक महीला | मारोती बेलैनो क्र. एमएच डी ई 3631 चा चालक सुरेश मोलचमद मोटवाणी वय 53 वर्ष रा. गुरुनानक मंदीर सिंध कँम्प अमरावती | हकिकत अशआ प्रकारे आहे की की, आज दु. 09/8/23 रोजी नेहमीप्रमाणे सायंकाळी 4.0 वा चे सुमारास नातेवाईकाला मोपेड गाडीने अंबागेट येथे सोडण्याकरीता जात असतांना ईर्विन चौक ते मालविय चौक च्या दरम्यान उडानपुलाजवळ एका पांढ-या रंगाच्या कारच्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन आम्हाला ओव्हरटेक करण्याच्या नादात आम्हाला कट मारुन आमच्या गाडीला ठोस मारली. त्यामुळे आम्ही दोघेही आमच्या मोपेड गाडीसह खाली पडलो व घसरत गेलो त्यामुळे तेथील लोकांनी जमवुन आम्हाला बाजुला बसवले मला दोन्ही पायाच्या गुडघ्याला मार लागला दोन्ही हाताच्या मनगटाला व उजव्या खाद्याला मुका मार लागला. तसेच माझे नातेवाईकाच्या हिच्या दोन्ही गुडघ्याला व कमरेला डाव्या खांद्याला मुका मार आहे. तेथे जमलेल्या लोकांनी सदर वाहन चालकाला थांबवुन ठेवल्यामुळे काही वेळाने तेथे पोलीस आले त्यांनी सदर वाहन चालकाला त्याचे गाडीसह व आम्हाला पोलीस स्टेशनला आणले तेव्हा सदर गाडी मारोती बलोनो क्र. एम एच 27 डि ई 3631 असे असुन आम्हाला ठोस, मारणा-या चालकाचे नाव सुरेश मुलचंद मोटवानी रा. गुरुनानकत मंदीर सिंधी कँम्प अमरावती असे असल्याचे समजले. शा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

# ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप नं ६१४/२०२३ कलम १४२ म पोकाँ | भहतसिंग चौक फ्रेजरपुरा | दि ०९.०८.२०२३ चे १२.५० दा ता वेळ - दि ०९.०८.२०२३ चे १४.०८ वा | पोहेकाँ सुनिल सोळंके ब न २८९ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती | भय्यु उर्फ मोहीत सुभाष सुर्यवंशी वय २२ वर्ष रा फ्रेजरपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांना गोपनीय माहिती मिळाली की, रेकाँर्ड वरील तडीपार आरोपी भय्यु सुर्यवंशी हा परिसरामध्ये फिरत आहे वरुन दोन पंचाना कुंभारवाडा चौकामध्ये बोलावुन माहीती देवुन त्याचा शोध कामी फ्रेजरपुरा लायब्ररी चौक या परीसरात रवाना झआलो असता १२.५० वा सुमारास भहतसिंग चौक फ्रेजरपुरा या ठीकाणी रेकाँर्ड वरील तडीपार आरोपी भय्यु सुर्यवंशी हा दिसुन आला सदर तडीपार ईसम यास स्टाँफ कडुन जागीच पकडुन त्यास पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव भय्यु उर्फ मोहीत सुभाष सुर्यवंशी वय २२ वर्ष रा फ्रेजरपुरा अमरावती असे सांगीतले सदर ईसम यास अमरावती शहरात येण्याचे कारण विचारणा केली असता उडवा उडवीचे उत्तर देत असमाधानकारक उत्तरे दिले सदर ईसम यास मा पो, उपयुक्त परिमंडळ १ यांते आदेश क्रं पोउपाअ/परि-१/तडीपार/११४५/२०२३ दि. ०४.०७.२०२३ अन्वये दि २५.०७.२०२३ पासुन अमरावती जि २ वर्षा करीता तडीपार आरोपी ा भय्यु उर्फ मोहीत सुभाष सुर्यवंशी वय २२ वर्ष रा फ्रेजरपुरा अमरावती यांचेवर १४२ महा पो कायदा अन्वये गुन्हा दाखल |
| २ | बडनेरा अप नं. ५७९/२०२३ कलम १८८ भादवी सह कलम ३ ७ महाराष्ट्र वि. म. व.इ.वि परिक्षा मध्ये होणा-या गैरप्रकारास अधिनियम १९८२ | अमरावती | दि. ०९/०८/२०२३ चे १६.००वा<br><br>दि ०९/०८/२०२३ चे २२.३५ वा<br><br>माहिती वेळ दि. ०९/८/२३ चे १९.०० वा | एक महीला | युवराज राजपुत रा औरगांबाद | हकीकत अशा प्रकारे आहे की, आज दि. ०९/०८/२३ रोजी १६.३० वा चे १८.३० वा च्या बॅच मध्ये युवराज राजपुत रा औरगांबाद याची तपासनी केली अशता कपिल विजयराव फुनसे एमएस सिक्युरिटी गार्ड ने परिक्षार्थी च्या छातीजवळ बनियन मध्ये सॅमसंग कंपनिचा मोबाईल आढळला सदरची बाब सिक्युरिटी गार्ड ने आम्हाला कळविली व त्या परिक्षनार्थी ला थांबविले वनपरिक्षेत्र अधिकारी व टिसी एस चे खाजगी सिक्युरिटी गार्ड व पो काॅ निलेश वानखडे यांनी त्याची झडती घेतली त्याच्या डाव्या हाताच्या जवळ बनियन च्या दोन सिन चे रबर कोटेड लहान फोन सदृष्य वस्तु स्पाय डिवायईस आढळले कानात मायक्रो रिअर फोन परिक्षार्थीच्या चप्पल मोबाईल सारखे साहीत्य नेवु शकेल त्या आकाराचे लोखंडी पत्र्याची लाल पेटी आढळली म्हणुन परिक्षार्थीला परिक्षेला बसु दिले नाही. सदर हकीकत वरिष्ठ अधिकारी यांचेशी संपर्क साधुन त्याचे आदेशानुसार त्यांची परिक्षार्थी आरोपी यावर पुढील कारवाई करण्याकामी आपल्या ताब्यात जमा करित आहे यापुढे सरकारी नोकरी साठी सदर परिक्षार्थी (आरोपी ) म्हणुन सदर परिक्षार्थी परिक्षा देण्याची शक्यता नाकारता येत नाही सदर आरोपी वर कडक कारवाई करण्यात यावी वरुन फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |
| 3 | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र. 337/2023 कलम 283 भादवी | जोशी मार्केट समोर अमरावतची | 09/08/23 चे 19.00 वा दाखल ता. वेळ 09/08/23 चे 21.53 वा. | सर<br><br>तर्फे स ापोउपनि राजेशसपकाळ ब नं 624 पोस्टे सिटी कोतवाली अम शहर | विजय गुलाबराव बडगे वय 53 वर्ष रा. हमालपुरा अमरावती | सविनय सादर आहे की, आम्ही सपोउपनि राजेंद्र सपकाळ पोस्टे सिटी कोतवाली अम शहर ब.नं. 624 सोबत नापोकॉ 296 पोकॉ 372 ,217 असे आज दि. 09/08/23 पोस्टे हजर असतांना पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीता रवाना झालो असता जोशी मार्केट समोर 19/00 वा आलो असता एक ईसम त्याचे ताब्य.तील वाहन क्र. एम एच 27 वि डब्लु 5081 ऑटो हा सार्वजनिक रोडवर धोकादायक स्थीतीत उभे करुन वाहतुकीस अडथळा निर्माण करतांना दिसला वरुन नमुद ठिकाणीं दोनम पंचाना बोलावुन पंचासमक्ष त्या ईसमाचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव विजय गुलाबराव बडगे वय 53 वर्ष जात- बौध्द रा. हमालपुरा हरिहर मंगल कार्यालयाची गल्ली अमरावती असे सांगितले तरी सदर ईसम हा आपल्या ताब्यातली ऑटो क्र. एम एच 27 वि डब्लु 5081 हा सार्वजनिक रोडवर धोकादायक स्थीतीत उभा करुन वाहतुकीस अडथळा निर्माण करतांनमा मिळुन आला. वरुन सदर ईसमाविरुध्द कलम 283 प्रमाणे गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र. 338/23 कलम 285 भादवी | गांधी चौक अमरावती | दि. 09/08/2023 चे 22/30 वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ 09/08/23 चे 22/44 वी. | सरतर्फे सपोउपनि रंगराव जाधव ब.नं. 921 पोस्टे सिटी कोतवाली अम शहर | विकास राजु विश्वकर्मा वय 22 वर्ष रा. लक्ष्मी अपार्टमेट राजापेठ अमरावती | सविनय सादर आहे की, आम्ही सपोउपनि रंगराव जाधव ब.नं. 921 पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर आज दि. 09/08/23 रोजी 21.00 वा ते दि. 10/08/23 चे 09/00 वा पोस्टे सिटी कोतवाली हद्दीत पेट्रोलींग होती.वरुन आम्ही व सोबत पोस्टॉप नापोकॉ 12, 328 ,1425 असे पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीता रवाना झालो पेट्रोलींग दरम्यान 22.30 वा गांधी चौक येथे आलो असता एक ईसम मानवी जिवन धोतक्यात येईल अगर अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहोचण्य़ाचा संभव असेल ईतक्या बेदरकारपणे व हयगयीने आपले टपरित /दुकानात ज्वालाग्राही पदार्थ असलेले गॅस सिलेंडर इंडियन कंपनीचे वापरतांना मिळुन आला. तो संभाव्य धोक्याबाबत पुरेसा बंदोबस्त करण्याचे जाणीवपुर्वक /हयगयीने टाळत असल्य़ाचे दिसुन आले. वरुन सदर ठिकाणी दोन पंचाना बोलावुन पंचासमक्ष त्या ईसमाचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव विकास राजु विश्वकर्मा वय 22 वर्ष रा. लक्ष्मी अपार्टमेंट राजापेठ अमरावती सांगितले. व तो सोनी चाईनिज या नावाने टपरी दुकानात वापरतांना दिसुन आला. तरी सदर ईसमान सार्वजनिक ठिकाणी आम रोडचे कडेला मानवी जीवन धोक्यात येईल , अगर अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहचण्याचा संभव असेल ईतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने आपले टपरी दुकानात ज्वालाग्राही पदार्थ असलेले गणस सिलींडर इंडियन कंपनीचे संभाव्य धोक्याबाबत पुरेसा बंदोबस्त करण्याचे जाणीवपुर्वक /हयगयीने टाळुन वापरतांना मीळुन आला वरुन त्याचे विरुध्द कलम 285 भादवी प्रमाणे माझी फिर्याद आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर मर्ग क्र. ५५/२०२३ कलम १७४जाफौ | राहते घरी परिहारपुरा वडाळी अमरावती<br><br>दि. ०९/०८/२०२३ चे १६.३ वा<br><br>दा.ता.वेळ दि. ०९/८/२०२३ सचे २३.१८ वा | बजरंग राजु राजवाडे वय २८ वर्ष,रा. परिहारपुरा वडाळी अमरावती | पवन राजु राजवाडे वय २४ वर्ष,रा. परिहारपुरा वडाळी अमरावती | गळफास घेवुन आत्महत्या | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील मृतका हा फिर्यादी चा मोठा भाउ असुन मृतकाला दारुचे व्यसन होते. यातील मृतक हा नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी दारुच्या नशेत घरी आला तो काही चिंतेत दिसत होता कादचित त्याला त्याच्या जवळ पैसे नव्हते म्हमुन तो चिंतेत होता असे फिर्यादीस वाटत होते. यातील मृतक हा थोळ्या वेळा नंतर वरिल रुम मध्ये गेला तेव्हा पिर्यादी व फिर्यादीचे घरचे मंडळी खालील रुम मध्ये असतांना फिर्यादीची काकु ही वरिल रुम मध्ये गेली असा तेथे तीला फिर्यादीचा भाउ यातील मृतक बजरंग याने वरिल रुम मधील फॅनला नॉयलॉन दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केलेली दिसली तर फिर्यादी काकु खाली येवुन सांगीतले असता फिर्यादीव घरातील सर्व मंडळी वर रुममध्ये गेले तर फिर्यादी व फिर्यादीचे माम फकिरचंद चौधरी या दोघांनी मृतक याला गळफासावरुन खाली उतरविले आणि तेव्हा मृतक मध्ये जिव असल्याचे वाटले तर फिर्यादी व फिर्यादीची आई माम असे सर्व मृतक याला इर्विन दवाखाना येथे घेवुन गेले असता इर्विन मधील डॉक्टर सा. यांनी सदर मृतक याला चेक करुन मृत घोषीत केले. अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला | स.पो.नि हीरोळे पो.स्टे. फ्रेजापुरा अमरावती शहर |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | नांदगाव पेठ मर्ग क्र.३६/२३ कमल १७४ जा.फौ. | नांदगाव पेठ राहते घरी | प्रफुल्ल विनायक भुयार वय ३५ वर्षे रा. नांदगाव पेठ अमरावती | सागर शालीक पोलाड वय ३२ वर्षे रा. ग्राम धोगा पो.स्टे. कुऱ्हा अमरावती ग्रामीण | गळफास घेतल्याने मृत्यु | हकिकत अशा प्रकारे आहे कि फिर्यादी यांना फोनद्वारे माहीती मिळाली कि त्यांचे जावाई यांनी त्यांचे घरात फासी घेतली आहे. अशा माहीती वरुन राहते घरी गेले असता खोलीचा दरवाजा तोडुन आतमध्ये प्रवेश केला असता नमुद मृतक हा खोलीतील पाळण्याचे दोरीला गळफास घेवुन लटकलेला दिसला त्यास पंच व पोलीसा समक्ष ईर्विन दवाखाना अमरावती येते नेले असता एम.ओ.सा. यांनी त्यास मृत गोषीत केले अशा फिर्यादी यांचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. | पोहेका संजय सगणे ब.नं. ९५३ पो.स्टे. नांदगाव पेठ |
| २. | पो स्ट खोलापुरीगेट<br>२१/२०२३ कलम १७४ जाफौ | स्वाभिमान नगर अकोली रोडअमरावती<br>दि. २६.०७.२०२३ चे ०३.०० वा<br>दाखल ता वेळ- ०९.०८.२०२३ चे २०.४२ वा | म्रुतक- धनराज डोमाजी तायडे वय 42 रा स्वाभिमान नगर अकोली | सरतर्फे गजानन माधन जांभुळकर वार्ड बॉय पंजाबराव देशमुख हॉस्पीटल अमरावती | जळाल्याने मृत्यु | हकीकत- सदर म्रुतक हा जळाल्याने दवाखान्यात भरती असता उपचारा दरम्यान मरण पावला वरुन सदरची मर्ग डायरी आज रोजी पोस्टेला प्राप्त झाल्याने सदर चा मर्ग दाखल करुन तपासात घेतला | पोउपनि आकाश महल्ले पो स्ट खोलापुरीगेट |

## जुगार रेड

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बडनेरा | अप.क्र.५७७/२०२३ कलम महाराष्ट्र जुगार कायदा | आठवडी बाजार नवि वस्ती बडनेरा | दि. ०९/०८/२०२३ चे १६.३० वा | दि. ०९/०८/२०२३ चे १७.३६ वा | सर तर्फे नापोकॉ प्रविण ढेंगेकर ब नं. ०६ पो स्टे बडनेरा | शेख युनुस भुरा चौधरी वय ५१ वर्ष गवळीपुरा नवि वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन नगदी १०२०/- रु व १ ते १० आकड्यांच्या वरील मटका जुगाराच्या २ चिठ्या एक बॉलपेन कि अं. ५/- रु असा एकुन १०२५/- रु चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हिशन

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजर पुरा | अप कं ६१३/२०२३ कलम ६५(फ) महा दा कायदा | अमरावती | दि ०९.०८.२०२३ चे ८.०० वा ते ८.३० वा | दि ०९.०८.२०२३ चे १०.१६ वा | पोहेकॉ दिपक महादेवराव सुंदरकर ब नं १४५६ गुन्हे शाखा अमरावती शहर | एक महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी बे पेटोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मीळाली की यातील महीला आरोपी ही आपल्या घरासमोर अवैधरित्या गावठी हातभट्टी दारु विक्री करत आहे अशआ माहीवरुन सदर आरोपी महीला हिटेवर प्रोव्ही रेड केली असता नमुद आरोपी महीला हित्या ताब्यातुन ५ लिटर गावठी हातभट्टी दारु ०३ बॉटलसह कि अं १५,०० रु चा माल मिळुन आला सदर माल जागीत नष्ट करण्यात आला सदर आरोपी महीलेचे कृत्य हे कलम ६५ (फ) म दारु कायदा अन्वये होत असल्याने तिच्या विरुध्द कायेदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे अशआ फिर्यादीच्या लेखी तर्कार वरुन अप सदरचा दाखल |
| २ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | अप क्र. ६१७/२०२३ कलम ६५(ई) म.दा.का. | वडरपुरा पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | दि. ०९/०८/२०२३ चे १८.०० वा | दि. ०९/०८/२०२३ चे २२.४५ वा १८.३० वा दरम्यान | पोहेकॉ सुनिल सोळंके ब.नं.२८९ पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहरते | नितिन हरिदास देवकर वय ३५ वर्ष, रा. वडरपुरा पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टाफ सह डि.बी पथक मध्ये पेट्रोलींग करित असता मिलालेल्या गोपनिय माहीतीवर यातील आरोपी याचेवर प्रोव्ही.रेड करुन जप्ती पंचनामा एक प्लास्टीक पिशवी ज्यामध्ये एकुण २२ नग देशी दारु बॉबी संत्रा ९० एम.एल. च्यापावट्या किं.अं.७७०/- रु.चा प्रोव्ही.मुद्देमाल मिळुन आल्याने सदर आरोपी याचेवर फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | बडनेरा | अप.क्र.५७८/२०२३ कलम ६५(ई) महा.दा.का. | अन्नाभाऊ साठे नगर जुनी वस्ती बडनेरा | दि.०९.०८.२०२३ चे २०.०० वा. | दि.०९.०८.२०२३ चे २२.०५ वा. | सरतर्फे नापोकॉ शशिकांत शेळके ब.नं.१३६० , पो.स्टे.बडनेरा , अमरावती शहर | निलेश तुकाराम वानखडे वय ३६ वर्ष रा अन्नाभाऊ साठे नगर बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फि.हे स्टाफसह पो.स्टे.हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीवरून नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा अवैध्दरित्या देशी दारुच्या पावट्यांची विक्री करतांना दिसला त्याचे वर प्रो केड करण्याकरिता गेलो असता तो पोलीसांना पाहुन हातातील पिशवी टाकुन पळुन गेल त्याच्या हातातील पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये ०९ नग देशी दारू बॉबी संत्रा प्रत्येकी १८० मि.ली.च्या सिलबंद बॉटल किं.अं.४९५/- रू.चा माल मिळुन आला. आरोपीचे सदरचे कृत्य हे कलम ६५(ई) महा.दा.का.प्रमाणे गुन्हा होते. अशा फि.चे लेखी फिर्यादीवरून सदरचा गुन्हा दाखल |